*लघुकथा*

“गुळपोळी”

“आगं चल उचल कि पाय लवकर!!”
”चालुन चालुन पाय लय दुखु लागलंयात आवो !!”
”आगं ती पुढं टपरी दिसती ना, तीत परयंतच जायचं हाय बघ !! चल बीगी बीगी !!”
”आवो जरा बारक्याला घ्या कि, रडुन रडुन जीव खाल्ला कारट्यानं !!”
”भुक लागली असंल,दे की पोरांनला दोन घास !!”
”अवो तुमी पनं खावुन घ्या की, कवापासनं मोठ्याला घेतलय खांद्यावर, समदं आंग दुखत आसंल तुमच्चं!!”
”व्हय !! वाईस जरा ती टपरी येवु दे,मग बसुन भरवं लेकरास्नी !!”

टपरीवर पोहोचल्यावर तिच्या शेड खाली बसुन तिने त्याला भाकर ठेचा वाढला,पोरांना पण भरवलं, तृप्तीचा ढेकर देवून त्यानं तिथंच पथारी पसरली, रणरणत्या उन्हात पटरीवर चालुन चालुन पाय सोलवटले होते त्याचे,पोराला खांद्यावर घेवून चालल्यामुळं गोळे आले होते पायात, प्रचंड थकवा जाणवत होता त्याला, बरोबरच्या बायाबापड्यांची थोडीफार तीच अवस्था होती,होणारच ना गेले दोन दिवस ते चालतच होते.

“आवो थोडी गुळपोळी खाता का ? तुमास्नी आवडते ना !!”

”नग नग म्या खायीन सावकाश,तु पोरास्नी भरवं !!”
”आवो त्यास्नी भरवली कवांच,वाईस तुमाला इचारलं !!”
”ठेव खाईन मागाहुन !!”

गुळपोळीच्या आठवणीने तो सुखावला,गावच्या आठवणी ताज्या होऊन त्याच्या स्मृतीपटलावर भराभर सरकु लागल्या,
तिला पहिल्यांदाच पाहिलं होतं त्यानं तिच्या घरी !! शेलाट्या बांध्याची,सरळ नाकाची,मोठ्या डोळ्याची,सावळ्या रंगाची ती,पाहताक्षणीच त्याला आवडली होती, तिच्या नाकातली नथ,कपाळावरील चंद्रकोरीचं गोंदण,डोळ्यातलं काजळ तीचं सौंदर्य आणखीनच खुलवत होतं, मंत्रमुग्ध होवुन एकटक तिच्याकडे पहातच बसला होता तो,
”आमच्या पोरीच्या हातची गुळपोळी तर खावुन बघा जावईबापू !!”
सासरेबुवांच्या बोलण्याने अचानक तो भानावर आला !!
“अं !! व्हय !!“
ताटातल्या पोळीचा त्यानं एक घास घेतला मात्र,अनं “लय भारी ” उस्फुर्तपणे ओरडलां,मग शरमेनं हळुच जिभ चावली त्यानं दाताखाली !!
दाराआडुन त्याला न्याहाळत असणारी ती, हळुच लाजली अनं दाराआड झाली,
तो प्रसंग जशाचा तसा ऊभा राहिला होता डोळ्यासमोर त्याच्या,
मनोमन सुखावला तो !!

त्याच्या घराच्या पडवीतच मांडवाखाली पाट लागला होता त्यांचा, लग्नाची दोन वर्ष आनंदात गेली, दोन मुलांच्या संसारात ती दोघं रमली, पुढं खाणीत झालेल्या सुरूंगाच्या स्फोटात म्हातारा अचानक गेला,म्हातारी तर त्याच्या लहानपणीच गेली होती,सरकारने खाणी बंद केल्या, शेतातली रोजी परवडेना,उपासमार होवु लागली,

"जग बदललं त्यांच्यासाठी !!

नाईलाजाने घराला टाळं लावुन निघाले शहरांकडे, कामाच्या शोधात,कधी रस्त्याच्या कामावर,कधी रोजगार हमीच्या कामावर तर कधी कंत्राटदाराकडं, कधी तो हमालांच काम करी न ती घरकामाचं !!

घर पाठीवर घेवुन उदरनिर्वाहाकरीता गावोगावं फिरत राहीले ते, या वेळी जरा खुश होता तो, कंन्सट्रकशन साईटवर मुकादम ची नोकरी मिळाली होती त्याला, तीथचं साईटवर घराची सोय झाली होती, पहिल्या पगाराला पोरांसाठी कापडं, तीच्या साठी हिरवं काठपदराचं लुगडं आणलं होतं त्यानं,आनंदात होती ती !!

"आताशी कुठं संसाराचे घडी बसत असतांना,अचानक पुन्हा त्यांच जग बदललं !!

सर्व शहर लॉकडावुन मधे गेलं, साईटवरचं काम बंद पडलं, कंत्राटदारानं हात वर केले, महिनाभर सरकारने नाश्ता जेवण पुरवलं, पण तेही वेळेवर मिळत नव्हतं, पोरांची उपासमार होवु लागली,घरातून बाहेर पडणं बंद झालं, कोणी म्हणे हि महामारी वर्षभर तरी राहणार, कोणी म्हणे देवीचा कोप आहे,भावकीतलं सर्व

गावाकडं निघण्याची तय्यारी करू लागले, पण रेल्वे बंद, बस बंद, जायचं तरी कसं,इथंच राहीलं तर महामारीने नाहीतर उपासमारीने मरण यायचं,अखेर भावकीबरोबरचं चालतच निघायंच ठरलं, तीने हाताशी पोराबाळांसाठी शिदोरी घेतली, थोडेफार गरजेचे सामान घेवुन नेसत्या वस्त्रानिशी भावकीतल्या १७/१८ लोकांच्या बायाबाप्यांच्या तांड्याबरोबर गावाकडे निघाले,दिवसभर हायवेच्या कडेनं चालत होते ,मध्येच कुठ सावलीला बस,वाटेत कुठ खायला मिळत का बघ, कुठं वाहनांला हात कर ,थांबलच तर जास्तचं भाडं,रात्री कुठं आडोशाला झोपलं तर भुरट्या चोरांची भीती, बायांमाणसावर घाणेरड्या नजरा, सकाळी पोलिसांची चौकशी, यामुळे जीव पार मेटाकुटीला आला होता त्यांचा.

“ त्यापरीस आपन पटरी पकडू,म्हंजी असला तरास होनार न्हाई बघा, अन् ट्रेन पन बंद हायेत,आक्शी सरल ट्रॅक पकडला कि पोचतोच बगा आपन !!
भावकीतला एक बोलला, त्यावर सर्वांचे एकमत होवुन पटरी पकडून चालायच ठरलं !!

पटरीवर चालतांना टोकदार खडीचा त्रास जाणवत होता, टोचत होती अनवाणी पायांना, तापलेल्या उन्हात पटरीवर चालणं तसं अवघड होत होतं, काही रूळाच्या बाजुने चालत होते, तिथं सुद्धा काही ठिकाणी काट्याकुट्यातनं,कडेकपारीतनं तर काही वेळा खड्याखुड्यातुन जाव लागत होतं,रात्रीच्या वेळी तर जनावरांच्या

भीतीनं पटरीवरनंच चालाव लागत होतं,लहान लहान लेकरांना अंगाखांद्यावर घेवुन जवळची बोचकी सांभाळत बायाबापडे गावाकडं जायला आतुर झाले होते,आता नजरेसमोर गावचं दिसत होतं, गावची ओढ लागली होती,कशाचीही पर्वा न करता गावाच्या दिशेनं पावलं झपाझप उचलत होती, दोन दिवस सतत चालल्यानंतर इथं रिकाम्या टपरीत विसावली होती ती !!

सायंकाळ होत होती, पोरं टोर पटरीवरच खेळत होती, काय चाललयं याची पुसटशी कल्पनाही त्या निरागस बछड्यांना नव्हती मुळी, नुकतीच जेवणं उरकुन बायाबापडे रूळावरच थकुन निवांत बोलत बसले होते, आदल्यारात्री सुद्धा पटरीवरच निवांत झोपा काढल्या होत्या त्यांनी,पटरीच्या सागवानी लाकडावर निदान पाठ तरी  टेकवता येत होती.
आताशा अंधारुन आलं होतं, बायाबापड्या जरा पटरीवर लवंडल्या,अन पोरं पण विसावली त्यांच्या कुशीत, बापेमानसं तिथंच पसरलीत !!
रूळावर डोकं ठेवून ती पण लेकरासह पटरीवर लवंडली, तिचा कोमल चेहरा उन्हानं रापला होता तरी त्यानं नुकत्याच घेतलेल्या हिरव्या लुगड्यात सुंदर दिसत होती ती,रात्रीच्या चंद्रप्रकाशात तीचा चेहरा आणखीनच उजळ दिसत होता,तिची अवस्था बघत,आपल्या नशिबाला कोसत,तिला न्याहाळत न्याहाळत तो पण झोपेच्या अधीन झाला.

मध्यान्ह रात्री लघुशंकेसाठी त्याला जाग आली, डोळे ऊघडता ऊघडत न्हवते त्याचे,झोपेची ग्लानी अजुन डोळ्यावर होती, अर्धवट झोपेतच कसाबसा लडखडत टपरीच्या मागच्या बाजुस झुडपात आडोशाला शिरला,

आणि अचानक धड्धड् धड्धड् असा क्षीण आवाज दुरूनच त्याच्या कानी येऊ लागला, झोपेत उमजेना त्याला, तो आवाज जवळ जवळ येत असल्याचा भास त्याला होत होता,आता आवाजाची तीव्रता आणखीनच वाढली, जड झालेले डोळे कसेबसे किलकिले करून टपरीच्या छपरावरून त्याने बघण्याचा प्रयत्न केला,

भोssssssssssss...........!!!

"हॉर्नचा प्रचंड मोठा कर्कश्य आवाज त्याच्या कानातच घुमला !! कानाचे पडदे अक्षरशा थरथरले !! दडे बसुन बधिर झाले काही क्षण !!

जमिनीची एक भयानक थरथर त्याला पायाखाली जाणवली,क्षणार्धात झोप ऊडाली त्याची, रात्रीच्या त्या अंधारात नीरव शांततेला चिरून धडधडत जाणारा तो आवाज नक्कीच ट्रेनचा होता, म्हणजे पटरीवर ट्रेन !!

"जीवाच्या आकांताने तो पटरीच्या दिशेने धावला, आणि तिथलं दृश्य पाहुन थबकलाचं !! हातापायातलं त्राणंच गेले, गर्भगळीत होऊन तिथंच मटकन बसला!!

जोरात किंकाळी मारण्याचा प्रयत्न केला त्याने पण कंठातुन आवाजच फुटत नव्हता !! डोकं सुन्न झालं होतं त्याचं !!”
पटरीवर सर्वत्र मानवी मांसाचा व रक्ताचा सडा पसरला होता,कोणाचे हात,कोणाचे पाय तुटून विखरुन पडले होते,कोणाचं धड त्याच्यां खांद्यावर न्हवतं, त्याच्या डोळ्यादेखत अगदी निघृणपणे चिरडलं होतं त्या निष्पाप जीवांना !!
ट्रेनच्या आवाजात बायाबाप्यांच्या त्या आर्त किंकाळ्या पण विरुन गेल्या होत्या,विव्हळण्याचा ऋदय पिळवटुन टाकणारा तो करूण आवाज फक्त ऐकु येत होता,विषण्ण नजरेने समोरचं दृश्य बघत होता तो,

“तीला अन लेकरांना त्याची नजर शोधु लागली, त्यानं पाहिलं..... तिथेच होती ती !!”

जिथे झोपली होती तिथेच, हिरव्या लुगड्यात,चेहर्यावरचा तो शेवटचा शांत निद्रीस्त भाव तसाच दिसत होता चंद्रप्रकाशात, दोन्ही पोरं घट्ट कुशीत पकडलेली, निस्तेज !!

वार्याच्या झुळकेने तिच्या मानेवरचा पदर ढळला अनं त्याने डोळेच झाकुन घेतले, जीवाच्या आकांताने त्याने हंबरडा फोडला !! छाती बडवून ओक्साबोक्सी रडु लागला !!
“ संपल,सार काही संपल होत त्याच्यासाठी !!!

”त्याचं जगणंच हे आता मरणासारख होत !!

पटरीवर विखुरलेल्या गुळपोळींकडे शुन्य नजरेनं बघत बसला फक्त !!!

( दुसर्यादिवशी वर्तमान पत्रात बातमी होती” रेल्वेच्या रूळावर झोपलेल्या १६ मजुरांचा मालगाडी खाली चिरडुन दुर्दैवी मृत्यु !!”)

राजेश संदानसिंग